Maharashtra State Board of Open Schooling.C/o State Board Secondary & Higher Secondary Education.S.R.No.832-A, Final Plot No.178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune - 411004.

Tel : Chairman (P) : (020)-25651751
Secretary (P) : (020) 25651750

महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, द्वारा महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ , सर्वे नं. ८३२-अ, प्लॉट नं. १७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर संशोधन संस्थेमागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे४११००४
EPABX -25705000Fax : 25665807
Email - msbospune@gmail.com

जा.क्र.रा.मं./संशोधन/मु.वि.मं./२०२४/ 3481
दिनांक : 3/09/२०२४

प्रति.

1. मा. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
2. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे,
3. मा. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
4. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
5. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे.
6. मा. मा. शिक्षण संचालक (योजना), पुणे
7. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व संशोधन मंडळ (बालभारती), पुणे.
8. मा. जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे),
9. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हे),
10. संचालक, महाराष्ट्र शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (मिपा), औरंगाबाद
11. विभागीय सचिव, विभागीय मंडळे (सर्व) महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य. शिक्षण मंडळ.

**विषय - महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाद्वारे दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक संधीं व सुविधांचा प्रचार व प्रसिद्धी करणेबाबत**

महाराष्ट्र राज्यात शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र. ममुवि- २०१६/प्र.क्र.०८/एस.डी.२ दिनांक २१ डिसेंबर २०१८. व्दारे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाची (ओपन बोर्ड) स्थापना करण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार औपचारिक शिक्षण न घेतलेल्या किंवा काही कारणाने औपचारिक शिक्षण अपूर्ण राहिलेल्या, जे दिव्यांग विद्यार्थी नियमित शाळेतील औपचारिक शिक्षण घेण्यास असमर्थ आहेत, तसेच ज्या विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणाच्या व्यतिरिक्त इतर विषयांचे शिक्षण घ्यायचे आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांना/ व्यक्तींना पर्यायी शिक्षण उपलब्ध करून दिले जाणार आहेत. सद्यस्थितीत इयत्ता पाचवी व इयत्ता आठवीसाठी प्रवेश दिले जात असून लवकरच इयत्ता दहावी व बारावीसाठी प्रवेश उपलब्ध करून दिले जाणार आहे.

सोबत राज्य मुक्त मुक्त विद्यालय मंडळाची माहितीपुस्तिका पाठवत आहे. तिचे अवलोकन व्हावे. त्यानुसार

1) आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर तसेच आपल्या विभागाकडून प्रकाशित होणारी नियतकालिके, मासिके व पुस्तकांमधून या योजनेला वेळोवेळी प्रसिद्धी देण्यात यावी.
2) केंद्र शासनाच्या धोरणानुसार इयत्ता तिसरी ते इयत्ता बारावी पर्यंतच्या शालेय पुस्तकांमधून गोष्टी व माहितीच्या स्वरुपात मुक्त शिक्षणासंबंधित माहिती समाविष्ठ करावी.
3) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अंतर्गत राज्याला दिलेल्या कृती कार्यक्रमानुसार महाराष्ट्र राज्य मुक्त मंडळाच्या (ओपन बोर्ड) परीक्षांना बसण्यासाठी आणि त्यानंतर उच्च शिक्षण संस्थांमध्ये प्रवेश घेण्यासाठी पर्यायी शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करावी. त्याकरिता वेबिनार, सोशल मीडिया आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांचे सहकार्य घ्यावे.
4) आपल्या विभागांतर्गत येणाऱ्या क्षेत्रीय स्तरावरील (गाव, गट/तालुका, व जिल्हा) स्तरावरील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांमार्फत या योजनेशी माहिती पोहचवावी.

5) स्थानिक पातळीवरील अंगणवाडी, ग्रामपंचायत, वार्ड ऑफिसेस, शाळा, गट व समूह साधन केंद्र, जिल्हा प्रशिक्षण संस्था येथील अधिकारी-कर्मचाऱ्यांपर्यंत सदर योजनेची माहिती पोहचवावी. आवश्यकतेप्रमाणे ONLINE प्रशिक्षण घ्यावे.
6) प्रवेशित होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी व्यक्तींना महा ई सेवा केंद्र व नागरी सेवा केंद्रांमधून ONLINE प्रवेश घेण्यासाठी सहकार्य करावे. तशा सूचना संबंधित कर्मचाऱ्यास देण्यात याव्यात.
7) राज्य मुक्त मुक्त विद्यालय मंडळाची प्रवेशासाठी नोंदणी http://msbos.mh-ssc.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईट) करावी. या वेबसाईटच्या नावाशी साधर्म्य असलेल्या इतर अनेक वेबसाईट आढळून येतील. त्यामुळे प्रवेशासाठी नोंदणी करताना वरील वेबसाईट असल्याची खात्री करावी.
8) उपरोक्त प्रमाणे योजनेची प्रचार प्रसिद्धी केल्यानंतर त्याचा सविस्तर अहवाल राज्य मुक्त मुक्त विद्यालय मंडळाच्या msbospune@gmail.com या इ-मेल पत्त्यावर पाठवावा.

अधिक माहितीसाठी संपर्क : राजेंद्र आंधळे, राज्य समन्वयक, महाराष्ट्र राज्य मुक्त मंडळ,पुणे.
दूरध्वनी क्र. ०२०- २५७०५१२२, २५७०५०००

(अनुराधा ओक)
सचिव
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ,

प्रत
१. मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
/- लोकराज्य, Maharashtra IGDPR समाज माध्यमे व इतर शासनमान्य नियतकालिके यातून प्रसिद्धीसाठी

जा.क्र. कोविमं/परीक्षा/२०२४-२५/ 1893
दिनांक : ०६/०९/२०२४

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य ,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविदयालये,
सातारा,सांगली, कोल्हापूर

विषय: महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाव्दारे दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक संधी व सुविधांचा प्रचार व प्रसिध्दी करणेबाबत.
संदर्भ : महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचे जा.क्र.रा.मं./संशोधन/मु.वि.मं./२०२४/३४८१ दि. ०३/०९/२०२४ रोजीचे पत्र.

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / उच्च माध्यमिक कनिष्ठ महाविदयालय यांचे मुख्याध्यापक/प्राचार्य यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाव्दारे दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक संधी व सुविधांचा प्रचार व प्रसिध्दी देण्याबाबत संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयास कळविलेले आहे. त्यानुसार सदर पत्राचे अवलोकन करुन सर्व शिक्षक, विदयार्थी, पालक व संबंधित सर्व घटकांना सदर बाब निदर्शनास आणून दयावी तसेच सदर पत्र आपल्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात यावे, याची नोंद घ्यावी.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव
कोल्हापूर विभागीय मंडळ.कोल्हापूर

प्रत माहितीस्तव सादर:
सचिव,महाराष्ट्र राज्य मुक्त विदयालय मंडळ,
पुणे.

# महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ, पुणे.

## Maharashtra State Board of Open Schooling (MSBOS), Pune.

सर्व्हे नं. ८३२ ए, फायनल प्लॉट क्र. १७८ व १७९, आघारकर संशोधन संस्थेच्या मागे,
बालचित्रवाणीशेजारी, भांबुर्डा, शिवाजीनगर पुणे - ४११००४
दूरध्वनी - ०२०-२५७०५१२२/२५७०५०००

Email ID - msbospune@gmail.com Website- http://msbos.mh-ssc.ac.in

---

महाराष्ट्र राज्यात शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र. ममुवि २०१६/ प्र.क्र.०८/ एस. डी. २ दिनांक २१ डिसेंबर २०१८ व्दारे महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाची (ओपन बोर्ड) स्थापना करण्यात आली आहे. या शासन निर्णयानुसार औपचारिक शिक्षण न घेतलेल्या किंवा काही कारणाने औपचारिक शिक्षण अपूर्ण राहिलेल्या, जे दिव्यांग विद्यार्थी नियमित शाळेतील औपचारिक शिक्षण घेण्यास असमर्थ आहेत, तसेच ज्या विद्यार्थ्यांना औपचारिक शिक्षणाच्या व्यतिरिक्त इतर विषयांचे शिक्षण घ्यायचे आहे, अशा सर्व विद्यार्थ्यांना/व्यक्तींना पर्यायी शिक्षण उपलब्ध करून दिले जाणार आहे.

## ✻ मुक्त विद्यालयाची वैशिष्ट्ये ✻

१. नियमित शिक्षणाच्या समकक्ष.
२. मराठी, इंग्रजी व उर्दू माध्यमातून सोय.
३. शासन मान्यताप्राप्त शाळांतील संपर्क केंद्रातून सोयीच्या वेळेनुसार शिक्षण घेण्याची संधी.
४. यापूर्वी कोणतेही शिक्षण झाले नसेल तरीही इयत्ता पाचवी, आठवीला वयाच्या अटीनुसार प्रवेश.
५. लवकरच इयत्ता दहावी व बारावीचे प्रवेश प्रस्तावित.
६. शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या प्रौढ व्यक्ती, दिव्यांग मुले, गृहिणी, कामगार, खेळाडू यांच्यासाठी अधिक सोयीचे.
७. विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य. तांत्रिक शिक्षण व कौशल्य विकास विभागाच्या वतीने चालवले जाणारे व्यावसायिक विषय उपलब्ध.
८. दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष विषय योजना.
९. संचित मूल्यांकनाची व्यवस्था (Transfer of Credit).

## ✻ समकक्षता ✻

सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळातून (MSBOS) प्राथमिक (इयत्ता पाचवी), उच्च प्राथमिक (इयत्ता आठवी) परीक्षांना प्रवेश दिला जातो. पुढील काळात माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता दहावी) आणि उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता बारावी) प्रवेश देणे प्रस्तावित आहे. सदर परीक्षांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (SSC व HSC बोर्ड) नियमित परीक्षांची समकक्षता राहील. महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या परीक्षा देवून पुढील शिक्षणासाठी राज्यात, देशात, परदेशात प्रवेश घेवू शकतील.

## ✻ मुक्त विद्यालयामध्ये प्रवेशासाठी पात्रता व कागदपत्रे ✻

### अ) प्राथमिक स्तर (इयत्ता पाचवी समकक्ष)

१. नोंदणी करतांना उमेदवाराचे वय किमान १० वर्षे पूर्ण असावे. कमाल वयाची अट नाही.
२. वयाचा दाखला सादर करावा लागेल. (वयाचा दाखला उपलब्ध नसल्यास त्याबाबतचे पालकांचे प्रतिज्ञा पत्र सादर करावे लागेल)
३. वय वर्षे १८ पेक्षा जास्त असल्यास आणि यापूर्वी शाळेत गेला नसेल, तर स्वयंघोषणापत्र लागेल.
४. वय वर्षे १८ पेक्षा कमी असल्यास आणि यापूर्वी शाळेत गेला नसेल, तर पालकांचे प्रतिज्ञापत्र द्यावे.

### आ) उच्च प्राथमिक स्तर (इयत्ता आठवी समकक्ष)

१. नोंदणी करतांना उमेदवाराचे वय किमान १३ वर्षे पूर्ण असावे. कमाल वयाची अट नाही.
२. वयाचा दाखला सादर करावा लागेल. (वयाचा दाखला उपलब्ध नसल्यास त्याबाबतचे पालकांचे प्रतिज्ञा पत्र सादर करावे लागेल)
३. वय वर्षे १८ पेक्षा जास्त असल्यास आणि यापूर्वी शाळेत गेला नसेल, तर स्वयंघोषणापत्र लागेल.
४. वय वर्षे १८ पेक्षा कमी असल्यास आणि यापूर्वी शाळेत गेला नसेल, तर पालकांचे प्रतिज्ञापत्र द्यावे.

### इ) माध्यमिक स्तर – इयत्ता दहावी (महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावी समकक्ष)

(मे/जून २०२५ पासून प्रस्तावित आहेत)

१. नोंदणी करतांना उमेदवाराचे वय किमान १५ वर्षे पूर्ण असावे. कमाल वयाची अट नाही.
२. वयाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

३. उमेदवार किमान इयत्ता ५वी उत्तीर्ण असावा. इयत्ता ५वी उत्तीर्ण झाल्यानंतर जी इयत्ता उमेदवार उत्तीर्ण झाला असेल त्या इयत्तेचे गुणपत्रक अथवा शाळा सोडल्याचा दाखला सादर करावा लागेल.

४. उमेदवार किमान २ वर्षे महाराष्ट्राचा रहिवासी असावा. त्यसाठी योग्य तो रहिवास पुरावा सादर करावा लागेल. उदा. तहसीलदार यांच्या सहीचा रहिवास (डोमिसाईल) दाखला/बँकेचे पासबुक/दूरध्वनी बिल/वीज बिल/रेशन कार्ड, इत्यादी.

५. राज्यमंडळाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेत (इयत्ता दहावी) उत्तीर्ण होऊ न शकलेला उमेदवार राज्य मुक्त विद्यालय मंडळाच्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षेसाठी प्रवेशित होऊ शकेल. या विद्यार्थ्यांना TOC (Transfer of Credit) चा फायदा देण्यात येईल. म्हणजे आधी उत्तीर्ण झालेल्या विषयांपैकी २ विषयांत सूट दिली जाईल. मात्र परीक्षेत प्रतिबंधित (डीबार) केलेल्या विद्यार्थ्यांस प्रवेश दिला जाणार नाही.

## ✻ नोंदणी ✻

१. प्रवेशासाठी नोंदणी http://msbos.mh-ssc.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईट) करावी. या वेबसाईटच्या नावाशी साधर्म्य असलेल्या इतर अनेक वेबसाईट आढळून येतात. त्यामुळे प्रवेशासाठी नोंदणी करताना वरील अधिकृत वेबसाईट असल्याची खात्री करावी.

२. नोंदणी केल्यापासून सहा महिन्यांनंतर उमेदवार परीक्षेसाठी पात्र होईल. तसे पात्रता प्रमाणपत्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाकडून संपर्क केंद्रांना पाठवले जाईल.

३. एकदा केलेली नोंदणी एका इयत्तेसाठी पाच वर्षांसाठी वैध राहील. (प्रत्येक इयत्तेसाठी स्वतंत्रपणे नोंदणी करावी लागेल.)

४. या नोंदणीद्वारे एका इयत्तेसाठी सलग पाच वर्षे किंवा सलग नऊ परीक्षांची संधी दिली जाईल.

५. वरील कालावधीत विद्यार्थी उत्तीर्ण न झाल्यास पुन्हा नोंदणीची सुविधा उपलब्ध राहील. पुनर्नोंदणीचा कालावधी आणि परीक्षाची संधी वरीलप्रमाणेच राहील.

६. नोंदणी करतेवेळी उमेदवाराचे नाव कोणत्याही शाळेच्या पटावर नसल्याचे प्रतिज्ञापत्र देणे आवश्यक असेल.

७. पुर्ननोंदणी केल्यानंतरही या पूर्वीच्या परीक्षेस मिळालेली सूट ग्राह्य धरली जाईल.

## ✻ अभ्यासक्रम ✻

१. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे आणि महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ (बालभारती), पुणे, यांचेमार्फत निश्चित केलेल्या विषय योजनेतील विषयांसाठी त्यांनी तयार केलेला अभ्यासक्रमावर आधारीत महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाने तयार केलेली पाठ्यपुस्तके, स्वयंअध्ययन पुस्तिका लागू राहतील.

## ❊ Online प्रवेशाची कार्यपद्धती ❊

१. http://msbos.mh-ssc.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर (वेबसाईट) जावे व सर्व सुचना व्यवस्थित वाचाव्यात.

२. अर्ज भरण्यासाठी http://msbos.mh-ssc.ac.in/Appication_Form.aspx या लिंकवर क्लिक करा.

३. अर्ज भरण्याची भाषा निवडा. (मराठी किंवा इंग्रजी)

४. अर्ज भरताना आपली वैयक्तिक माहिती अचूक भरावी. उदा. स्वतःचे नाव, पत्ता, जन्मतारीख, आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, ई–मेल आयडी, इयत्ता, विषय, माध्यम व संपर्क केंद्र क्रमांक, इत्यादी.

५. अर्जावर अलीकडच्या काळातील स्वतःचा फोटो स्कॅन करून अपलोड करावा व तो सबमिट करावा.

६. मराठीतून माहिती भरण्यासाठी युनिकोड उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे ती माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. तसेच आवश्यकतेनुसार दुरुस्ती करून माहिती अंतिम करावी.

७. उमेदवाराने कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी स्कॅनर अथवा मोबाईलद्वारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावे. उमेदवाराने अर्जामध्ये मोबाईल क्रमांक व ईमेल आयडी पुढील संपर्कासाठी नोंदविणे अनिवार्य आहे.

८. उमेदवार नाव नोंदणी शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्क पुढील तीन प्रकारे भरू शकतात. (१) ऑनलाईन भरणा (Online Payment), (२) NEFT द्वारे (३) संपर्क केंद्रावर रोखीने शुल्क भरल्यास त्याची पावती उमेदवाराने संपर्क केंद्रावरून उपलब्ध करून द्यावी. अर्ज भरून झाल्यावर त्याची प्रिंट काढावी.

९. उमेदवाराने ऑनलाईन भरलेल्या नोंदणी अर्जाची प्रत (Print Out) नोंदणी शुल्क व इतर आवश्यक कागदपत्रे (मूळ प्रमाणपत्रांसह) संपक केंद्रावर दोन प्रतीत त्वरित/निर्धारित मुदतीत जमा करावीत व एक प्रत स्वतःकडे ठेवावी.

१०. पात्र उमेदवारास ऑनलाइन पद्धतीने नाव नोंदणी प्रमाणपत्र (Enrollment Certificate) उपलब्ध करून देण्यात येईल.

११. पात्र उमेद्वारांनी संपर्क केंद्रामार्फत महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळाकडे स्वयंअध्ययन साहित्याची मागणी करावी व पुढील संपर्क शिबिरासाठी नियोजनाप्रमाणे उपस्थित रहावे.

# मुक्त शिक्षण प्रक्रियेतून शिक्षण घेतलेले काही नामवंत विद्यार्थी



पद्मभूषण पी. गोपीचंद
आंतरराष्ट्रीय बॅडमिंटनपटू



मेरी कोम
ऑलिम्पिक पदक विजेती बॉक्सर



एल अथीरा कृष्णा
व्हायोलीन वादक गिनीज बुक रेकॉर्ड



काव्या माधवन
चित्रपट अभिनेत्री



पद्मश्री दीपिका पल्लीकल
आंतरराष्ट्रीय स्क्वॅश खेळाडू



डॉ. विनोदकुमार चौधरी
टायपिंग मॅन ऑफ इंडिया,
१९ गिनीज बुक रेकॉर्ड



एम. एस. गणेश विश्वनाथन
शास्त्रीय गायक



जय क्वेहेनी
भरतनाट्यम नृत्यांगना, तमिळ अभिनेत्री



वरुण ठक्कर
ऑलिम्पिक नौकानयन खेळाडू



सोमदेव देववर्मन
कॉमनवेल्थ स्पर्धेत टेनिस
सुवर्ण पदक

या शिवाय पी. गायत्री गोपीचंद (कॉमनवेल्थ स्पर्धेत बॅडमिंटन रौप्य पदक), एम.सी. आकर्ष (पायाने चित्र काढणारा दिव्यांग विद्यार्थी) लिमा बाबू (तमिळ अभिनेत्री), अरमान महंम्मद इब्राहीम (फॉर्मुला वन कार रेसर) अमरज्योत सिंग (आंतरराष्ट्रीय गोल्फ खेळाडू) इत्यादी नामवंत व्यक्तींनी मुक्त विद्यालयातून शालेय शिक्षण पूर्ण केले आहे.

*प्रकाशक - सचिव, महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ* (MSBOS), *पुणे.*

## ✻ अधिक माहितीसाठी संपर्क साधा ✻

**राजेंद्र आंधळे, राज्य समन्वयक**
महाराष्ट्र राज्य मुक्त विद्यालय मंडळ (MSBOS), पुणे.
दूरध्वनी - ०२०-२५७०५१२२/२५७०५०००
**मोबाईल क्र. - ९८५०१९७९६९**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ

## माहितीसाठी संपर्क करण्याकरीता विभागीय मंडळे

| अ. क्र. | विभागीय मंडळ | पत्ता | समाविष्ट जिल्हे |
|---|---|---|---|
| १ | पुणे | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे-४११००५. दूरध्वनी: (०२०) २५५३६७८१,८२,८३ फॅक्स: (०२०) २५५३६७६१ | पुणे, अहमदनगर, सोलापूर |
| २ | नागपूर | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१ दूरध्वनी (०७१२) २५६०२०९ फॅक्स : (०७१२) २५६१७७५ | नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया |
| ३ | औरंगाबाद | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, औरंगाबाद विभागीय मंडळ, रेल्वे स्टेशन रोड, उस्मानपुरा, औरंगाबाद - ४३१००५. दूरध्वनी: (०२४०) २३३४२२८ फॅक्स: (०२४०) २३२१२०१ | औरंगाबाद, बीड, परभणी, हिंगोली, जालना |
| ४ | मुंबई | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ, प्लॉट नं. २७ व २८, सेक्टर-१६ए, वाशी, नवीमुंबई - ४००७०३. दूरध्वनी: (०२२) २७८८१०७५/७७ फॅक्स: (०२२) २७६५९४९१ | मुंबई, बृहन्मुंबई, ठाणे, रायगड, पालघर |
| ५ | कोल्हापूर | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोल्हापूर विभागीय मंडळ, ५३९, कसबा करवीर, शिवाजी विद्यापीठामागे, राजेंद्रनगर जवळ, कोल्हापूर - ४१६००४. दूरध्वनी: (०२३१) २६९६१०१,०३ फॅक्स: (०२३१) २६९०७५८ | कोल्हापूर, सातारा, सांगली |
| ६ | अमरावती | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, अमरावती विभागीय मंडळ, शास्त्रीनगर, अमरावती-४४४६०२. दूरध्वनी: (०७२१) २६६२६५७ फॅक्स: (०७२१) २६६२७४९ | अमरावती, अकोला, बुलडाणा, वाशिम, यवतमाळ |
| ७ | नाशिक | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, वाणी हाउस, ऋणानुबंध मंगल कार्यालयासमोर, न्यु मुंबई-आग्रा महामार्ग, नाशिक-४२२००१ दूरध्वनी : (०२५३)२५९२१४१/४३ फॅक्स : (०२५३) २५९२३५९ | नाशिक, जळगांव, धुळे, नंदुरबार |
| ८ | लातूर | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, लातूर विभागीय मंडळ, सूत मिल एरिया, राजस्थान मारवाडी हायस्कूलच्या मागे, कणेरी रोड, लातूर-४१३५३१. दूरध्वनी : (०२३८२) २५८१४१ फॅक्स : (०२३८२) २५८२१९ | लातूर, नांदेड, उस्मानाबाद |
| ९ | कोकण | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, कोकण विभागीय मंडळ, एम.आय.डी.सी., इ-७७/०६, मिरजोळे, रत्नागिरी - ४१५६१२. दूरध्वनी: (०२३५३) २३१२५१ | रत्नागिरी, सिंधुदुर्ग |